ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

“ अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १८ पुणें, बुधवार तारीख ६ फेब्रुवारी, १९५२ अंक ६

## विविध माहिती

**नैसर्गिक दांतच चांगले**— सोन्याच्या अगर क्रोमिअमच्या कृत्रिम दांतांपेक्षां नैसर्गिक दांतच चांगले असल्याचा प्रचार युगोस्लाव्हिआंत करण्यांत येत आहे. युगोस्लाव्हिआंतील कांहीं खेड्यांतून असा समज रूढ आहे कीं, नृत्यप्रसंगीं हसतांना सोन्याचे दात दाखविणें म्हणजे सौंदर्याचें लक्षण आहे. मूळचे दांत काढून त्या ठिकाणीं सोन्याचे दात बसविण्यासाठी शेतकरी दंतवैद्याला स्वतःचें सोनें देत असत.

**शिक्षणासाठी देणग्या**— १९५१ च्या शेवटच्या तिमाहींत अमेरिकेंतील रॉकफेलर फौंडेशननें भारत, तुर्कस्थान, सिरिआ व लेबॅनॉन ह्या देशांतील शिक्षणसंस्थांना देणग्या दिल्या. भारताला ७५,००० डॉलर्सची एक आणि २१,७७९ डॉलर्सची एक अशा दोन देणग्या मिळाल्या. संसर्गजन्य रोगांच्या विषाबाबत एक प्रयोगशाळा पुणें येथें स्थापण्यासाठी पहिलीचा विनियोग होईल. दुसऱ्या देणगीनें म्हैसूर, मद्रास, कलकत्ता, मुंबई, लखनौ आणि अमृतसर ह्या शहरांतील शैक्षणिक संस्थांना मदत मिळाली.

**विम्याचें आणखी एक दालन**—समुद्रकांठीं राहून आपद्-प्रसंगीं जीव बचावणाऱ्या लोकांचा एक क्लब ऑस्ट्रेलिआंत आहे. ह्या क्लबाच्या सभासदांच्या जीवितांची जोखीम एका ऑस्ट्रेलिअन कंपनीनें घेतली आहे. शार्क माशाच्या हल्ल्यापासून बुडणाऱ्यांचें रक्षण करण्याचें काम सभासद करतात. अविवाहित सभासदाला मृत्यु आल्यास ५०० पौंड आणि विवाहितास १,००० पौंड रक्कम देण्यांत येणार आहे.

**जपानची बाहुली**— जपानमधील एका संस्थेनें फिलिपाइन्स-मधील मुलांना वांटण्यासाठी ७०,००० बाहुल्या नुकत्याच पाठविल्या. हीं खेळणीं जपानी मुलांनीं तयार केलीं असून तीं फिलिपाइन्समधील शाळकरी मुलांना आणि धर्मार्थ संस्थांना वाट-ण्यांत येणार आहेत.

**अमेरिकेंतील द्रव्यदायक बोलपट**—‘ गॉन वुइथ दि विंड ’ ह्या अमेरिकन बोलपटाला सर्वांत अधिक म्हणजे २,५९,००,००० डॉलर्स उत्पन्न झालें. त्याच्या खालोखाल ‘ दि बेस्ट इअर्स ऑफ अवर लाईफ ’ ह्या बोलपटाला १,०३,६०,००० डॉलर्स उत्पन्न झालें. ‘ ड्युएल इन् दि सन ’ ह्या बोलपटाला ९८,००,००० डॉलर्स उत्पन्न झालें. ह्यांपैकीं पहिल्या व तिसऱ्या बोलपटाची निर्मिति डेव्हिड सिझनिक ह्या निर्मात्यानें केली होती.

**भारतामधील भाताची लागवड**—भारतामध्यें भाताच्या पिकाखालील एकूण जमीन सुमारें ४,७७,००० एकर आहे. त्या-पैकीं ३,२६,००० एकर जमीनीला पाटबंधाऱ्यांपासून पाणी-पुरवठा होतो. गेल्या वर्षी ४,९०,००० एकर जमीन भाताखालीं होती असा अंदाज करण्यांत आला होता. लागवडींत झालेली ही ३ टक्के घट पेरणीच्या वेळीं प्रतिकूल हवामान असल्यानें झाली.

**विश्वकिरणांसाठी प्रयोगशाळा**—विश्वकिरणांबाबत ( कॉस्मिक किरण ) संशोधन करण्यासाठी अलिगड व काश्मीर विद्यापीठांनीं पुरस्कृत केलेली एक प्रयोग शाळा श्रीनगरपासून २८ मैलांवर असलेल्या गुलमर्ग येथें काढण्यांत आली आहे. भारतांतील अशा प्रकारची ही पहिलीच प्रयोगशाळा आहे.

**सांडपाण्याच्या उपयोगाची योजना**—कानपूर नगरपालि-केनें शहरांतील सांडपाण्याचा उपयोग अधिक धान्य पिकविण्या-साठीं करून घेण्याची जी योजना अंमलात आणली आहे, तिला आतां मध्यवर्ती सरकारकडून मान्यता मिळाली आहे. इतर राज्यांनींहि आपआपल्या अशा प्रकारच्या योजना लवकर अंमलांत आणाव्या, अशी शिफारस भारतीय सरकारनें केली आहे.

**इजिप्तकडून कापसाची खरेदी?**—भारत सरकारनें इजिप्त-कडून ६०,००० गांठी सुदान–कापूस विकत घेण्याचें ठरविलें आहे असें समजतें. कापसाची किंमत इजिप्तमधील कापसाच्या किंमतीशीं निगडित ठेवण्यांत येणार आहे; आणि भारतांतील व्यापाऱ्यांनीं इजिप्तमधील व्यापाऱ्यांकडून तो घ्यावयाचा आहे. भारत सरकार तो मिळण्याची हमी मात्र इजिप्त सरकारकडून घेईल.

**भारतासाठी सयामचा तांदूळ**— १९५२ सालीं भारताला १,६०,००० टन तांदूळ देण्याचें सयामनें कबूल केलें आहे. तांदुळाची किंमत सयामला डॉलरमध्यें पाहिजे आहे. तथापि भारताकडून पौंडांत किंमत घेऊन त्यांच्या बदली बाजारांतील चालू हुंडणावळीच्या दरानें डॉलर्स घेण्याची तयारी सयामनें दाखविली आहे.

**भुइमुगाच्या पेरणींत वाढ**—१९५१–५२ सालांत भार-तांत एकूण ९,८८३ हजार एकर जमिनींत भुइमूग लावण्यांत आला आहे, असा अंदाज करण्यांत आला आहे. गेल्या वर्षी भुइमुगाच्या लागवडीचें क्षेत्र ८,९५७ हजार एकर इतकें होतें. म्हणजे १९५१–५२ सालीं क्षेत्रांत १०·१ टक्क्यांनीं वाढ झाली आहे.

**भारतांत तेल कोठें सांपडेल !**—बर्मा शेल कंपनीचे प्रमुख भूस्तरशास्त्रज्ञ मि. इव्हॅन्स ह्यांनीं असा अंदाज केला आहे कीं, पूर्व आसाममध्यें दिगबोईच्या आसपासच तेलाच्या मुबलक-खाणी सांपडण्याचा संभव आहे. त्याच्या खालोखाल द. आसाममध्यें तेल सांपडण्याची शक्यता आहे; बाकीच्या राज्यांतून तेल सांपडण्याची फारशी शक्यता नसल्याचेंहि त्यांनीं सांगितलें.

**मशीन टूल्सचें प्रदर्शन**—ब्रिटनमध्यें ऑलिम्पिया येथें यांत्रिक हत्यारांचें एक आंतरराष्ट्रीय प्रदर्शन भरविण्याची तयारी चालू आहे. प्रदर्शनाचा विस्तार २॥ लाख चौरस फूट भूमीवर पसरणार आहे. प्रदर्शनांत इंग्लड, फ्रान्स, अमेरिका, बेल्जम, स्विट्झरलंड; इटली, इत्यादि अनेक देश आपआपलीं यांत्रिक हत्यारें दाखविण्यासाठी ठेवणार आहेत. हें प्रदर्शन ब्रिटनमधील मशीन—टूल्स ट्रेड्स असोसिएशनतर्फे भरविण्यांत येत आहे. तें बहुधा १७ सप्टेंबर ते ४ ऑक्टोबर १९५२ पर्यंत भरविण्यांत येईल.

**बोटी घेण्यासाठी तरतूद**—हिंदी जहाज कंपन्यांना नवीन बोटी घेण्यास मदत करण्यासाठीं भारतीय सरकार ३ कोटी रुपये कर्ज देण्याची तरतूद नवीन अंदाजपत्रकांत करणार आहे असें समजतें. ह्यापैकी दोन कोटी रुपये महासागरी प्रवास करणाऱ्या बोटींच्या खरेदीसाठीं असून एक कोटी रुपये किनाऱ्यालगतची वहातूक करणाऱ्या बोटींसाठी देण्यांत येणार आहेत. चालू अंदाजपत्रकांत १,२६,००,००० रुपयांची सोय करण्यांत आली होती; त्यामुळेंच भारत शिपिंग कंपनीला एक बोट विकत घेतां आली.

**वैद्यकीय संस्थेला परदेशीय मदत**— दिल्ली येथें एक वैद्यकीय संस्था आणि कॉलेज काढण्यासाठी न्यूझीलंडनें १० लाख न्यूझीलंड पौंडांची मदत देण्याचें कबूल केलें आहे. १० लाख पौंड म्हणजे सुमारें १०६ लाख रुपये होतात. त्यापैकीं २॥ लाख पौंड ताबडतोब मिळणार आहेत. संकल्पित वैद्यकीय कॉलेज १९५३ सालीं सुरू होईल. ही मदत कोलंबो योजनेप्रमाणें देण्यांत येत आहे.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

भाग गेला । शीण गेला ।
अवघा झाला । आनंद ॥
—तुकाराम महाराज.

**नवीन १००० टनांची मशिनरी सुरूं होऊन १००० पोतीं साखर तयार झाली.**

येत्या हंगामांत ७५००० पोतीं म्हणजे कंट्रोल दरानें

**साठ लक्ष रुपयांची साखर तयार होईल.**

शेअर-विक्री सुरू आहे

**ता. ३१ मार्च १९५२ पर्यंत**

***ठेवींची मुदत १ वर्ष—व्याज ६ टक्के***

शेअर व ठेवींचे फॉर्म पुणें येथील मुख्य कचेरींत मिळतील.

९८० कॉमनवेल्थ बिल्डिंग,
सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. २५ जानेवारी १९५२.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एल्एल्. बी.,
सी. जी. आगाशे ॲण्ड को.,
मॅनेजिंग एजंट्स.

# अर्थ

बुधवार, ता. ६ फेब्रुवारी, १९५२





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## अर्थमंत्र्यांची लंडन येथील परिषद् व हिंदची परिस्थिति

लंडन येथें जानेवारी महिन्यांत भरलेल्या साम्राज्याच्या अर्थमंत्र्यांच्या परिषदेचा उद्देश डॉलरटंचाईचे बाबतींत कोसळलेली आपत्ति दूर करणें, हा होता. परंतु लंडन परिषदेंत झालेल्या चर्चेवरून असें दृष्टोत्पत्तीस येतें कीं हा उद्देश तितकासा सफल झाला नाहीं. कारण एक तर ब्रिटिश राष्ट्रकुटुंबांतील प्रत्येक देशाची परिस्थिति भिन्न भिन्न आहे व त्यामुळें विचारांची एकवाक्यता होणें अशक्य होतें व दुसरी गोष्ट म्हणजे १९५० मध्यानंतरच्या कोरियन युद्ध-प्रकरणापासून जगाचें राजकारण जास्त बिकट होत चाललें आहे व डॉलरटंचाईला तोंड देण्याचा सर्वसामान्य मार्ग जसा १९४९ च्या सप्टेंबरमध्यें शक्य झाला तशी परिस्थिति आज उरलेली नाहीं. स्टर्लिंग गटांतील सर्वच देशांची परिस्थिति या दृष्टीनें असावी तितकी कणखर किंवा जोरदार नाहीं. परराष्ट्रीय व्यापारांतील तूट भरून काढावयाचे मार्ग स्वीकारावे तर त्यामुळें देशांतील अंतर्गत पुनर्घटनेच्या योजनांवर त्याचा कदाचित् विपरीत परिणाम होणें संभवनीय आहे. कारण, परदेशच्या आयातीवर हिंदसारख्या देशाचे पुनर्घटनेचे कार्यक्रम अवलंबून आहेत. स्टर्लिंग गटांतील देशांची एकवाक्यताहि यापुढें किती दिवस टिकून राहूं शकेल हाहि एक वादाचा प्रश्न आहे व कांहीं दिवसांपूर्वी हिंदचे माजी अर्थमंत्री डॉ. जॉन मथाई यांनीं या बाबतींत शंका प्रदर्शित करणारे विचार व्यक्त केल्याचें ऐकिवांत आहे. डॉलर टंचाईच्या संकटाला तोंड देण्यासाठीं स्टर्लिंग गटांतील प्रत्येक देशानें आपलें उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न केला पाहिजे व आपली आर्थिक परिस्थिति वाढत जाणाऱ्या उत्पादनाच्या मार्गानें सुधारली पाहिजे. परंतु असें करणेंहि आजच्या काळांत सूचना करण्याइतकें सोपें राहिलेलें नाहीं. ब्रिटिश पौंड मजबूत करावा व त्याची किंमत वाढवावी अशी भाषा कांहीं महिन्यापूर्वी बोलली जात होती तोंच अगदीं अलिकडे जानेवारीच्या लंडन येथील परिषदेच्या वेळीं पौंड शक्य तर किंमतीनें उतरवावा, म्हणजेच त्याचें अवमूल्यन करावें ही भाषा बोलली जात होती. कांहीं झालें तरी स्टर्लिंग इतर चलनांत रूपान्तरित करतां यावें ही योजना लंडन परिषदेनें मान्य केली आहे व त्या दृष्टीनें राष्ट्रकुटुंबांतील देशांकडून प्रयत्न केले जातील. परंतु हें साध्य व्हावयाचें तर स्टर्लिंग गटांतील ज्या देशांना व्यापारांत अनुकूल तफावत उरत आहे अशा देशांची मदत पाहिजे. अमेरिकेचे प्रयत्न त्या देशांतील अंतर्गत मंदी टाळावी या दृष्टीनें होत असून त्याच वेळीं युद्धतयारीच्या दृष्टीनें वाढता लष्करी खर्चहि चालू आहे व आशियांतील मागासलेल्या देशांना मदत करण्याकडे अमेरिकेची प्रवृत्ति उदार बनत चालली आहे. या दृष्टीनें विचार केला असतां कदाचित् असें संभवनीय दिसतें कीं, यापुढें स्टर्लिंग गट व डॉलर प्रदेश यांचे संबंध आर्थिक दृष्ट्या थोडेसे सुधारूंहि शकतील. परंतु या बाबतींत निश्चित अनुमान काढणें कठीण आहे. ब्रिटनमधील कांहीं बँकांचे अध्यक्ष यांनीं नुसत्याच व्यक्त केलेल्या मतांवरून मात्र ब्रिटनवर आर्थिक संकट ओढवलें आहे हें स्पष्टपणें दिसतें व उत्पादनवाढीच्या कार्यक्रमाशिवाय या संकटाला तोंड देतां येणार नाहीं. ब्रिटनचे अर्थमंत्री मि. बटलर यांनीं म्हटल्याप्रमाणें लंडन परिषदेनें स्टार्लिंग गटांतील देशांना जणूं कांहीं जीवदान दिलें आहे असें दिसतें. परंतु या पुढें स्टार्लिंग देशांतील ही एकवाक्यता टिकून राहाण्यावरच भावी काळांतील गोष्टी अवलंबून आहेत.

ता. २९ जानेवारी रोजीं ब्रिटनचे अर्थमंत्री मि. बटलर यांनीं आजच्या आर्थिक आपत्तीला तोंड देण्यासाठीं पुढील कार्यक्रम जाहीर केला आहे. पुढील सहा महिन्यांत मुलकी नोकर वर्गांत दहा हजारांची कपात करण्यांत येईल. अमेरिकेंतून कोळशाची आयात कमी केली जाईल. अन्नाचा पुरवठा आणखी कमी करण्यांत येईल, बेकारी व उपासमारी यांना ब्रिटनला तोंड द्यावें लागणार असून राष्ट्रकुटुंबांतील इतर देशांवरहि आर्थिक संकट ओढवेल. गेल्या नोव्हेंबर महिन्यांत ब्रिटननें आयातींत जाहीर केलेल्या कपातीव्यतिरिक्त १५ कोटी पौंडांची आणखी कपात करावी लागेल, व यामुळें एकूण आयातींत ५० कोटी पौंडांची कपात शक्य होईल. सरकारनें स्विकारलेल्या कल्याणकारक गोष्टींच्या बाबतींतहि खर्चांत कपात केली जाईल. घरें बांधण्याचा कार्यक्रम पूर्वीप्रमाणें जोरदार रीतीनें चालणार नाहीं, तर तो थोडया प्रमाणांत स्थगित किंवा मंद करावा लागेल. पोलादावर पुन्हां नियंत्रण ठेवलें जाईल. संरक्षणाचा पूर्वीच्या सरकारनें हातीं घेतलेला कार्यक्रम तसाच पुढें चालविला जाईल.

लंडन परिषदेच्या पार्श्वभूमींत हिंदच्या परिस्थितीचा विचार करतांना असें दिसतें कीं अमेरिका व हिंद यांमध्यें आर्थिक मदत १९५२ अखेरपर्यंत सुमारें २५ कोटी रुपये किंमतींची स्वीकारण्याचा करार झाला असल्यामुळें, व जागतिक बँकेकडूनहि पूर्वी मिळाली इतकी आणखी मदत मिळेल असें चिन्ह दिसत असल्यामुळें कदाचित् आजची डॉलर टंचाई ब्रिटनप्रमाणें हिंदला तितकीशी जाणवणार नाहीं. परंतु परराष्ट्राच्या मदतीवर किती अवलंबून असावें याला मर्यादा आहेच. मध्य सरकारच्या अंदाजपत्रकांत चालू वर्ष अखेर २५ कोटी रु. शिल्लक राहील असा आशावाद व्यक्त करण्यांत आला आहे, हें सुचिन्ह आहे. परंतु मुंबई राज्याचें नुकतेंच तयार करण्यांत आलेलें अंदाजपत्रक परिस्थितीच्या दडपणामुळें तुटीचें झालें आहे व नवीन करांचें दडपण सहन करावें लागणार आहे. मुंबई नगरपालिकेच्या अंदाजपत्रकाच्या प्रास्ताविक चर्चेंतहि नवी करवाढ आहे. सारांश, हिंदमध्यें अंतर्गत परिस्थिति कांहीं बाबतींत आशावादी तर कांहीं बाबतींत चिंता करण्यासारखी दिसते.

## शेतकऱ्यांची बचत व सहकारी बँकिंग

### ग्रामीण सहकारी बँकेची योजना

(श्री. वा. पुं. वर्दे, बी. कॉम.)

प्रत्येक स्वतंत्र उद्देशासाठी स्वतंत्र सोसायटी असावी ही जुनी कल्पना आतां सोडून देण्यांत आली आहे. तिची जागा आतां दुसरी कल्पना घेऊं लागली आहे. शेतीविषयक पतपेढीचें रूपांतर अनेकविध उद्दिष्टें असलेल्या सहकारी सोसायटींत करणें अथवा मुळांतच अशी सोसायटी काढणें ही ती कल्पना होय. एका गांवासाठी एक सोसायटी स्थापन करण्याऐवजीं जवळ जवळ असणाऱ्या खेडेगांवांच्या गटांसाठी एक सोसायटी स्थापन करण्याकडे आतां कल आहे. शेतीच्या मालाची खरेदी–विक्री आणि शेतीच्या गरजा ह्यांच्याशीं पतीचे व्यवहार निगडित झालेले आहेत. त्यामुळें बचत जमा करणारी बँक आणि खरेदी–विक्री करणारी सहकारी संस्था ह्यांची गल्लत करणें आतां बरोबर होणार नाहीं. सहकारी संस्थेच्या विपरीत कारभाराचा बँकेवर अनिष्ट प्रभाव पडण्याचा संभव असतो. म्हणून ह्या दोन्ही व्यवहारांना स्वतंत्र ठेवणेंच युक्त आहे.

ग्रामीण भागांत विखुरला गेलेला पैसा देशाच्या विकासासाठी कसा एकत्र आणतां येईल ? बचत झालेला पैसा शेतकऱ्यांकडून बाहेर काढून खेड्यांतून आणि लहान शहरांतून बँकिंगची सोय करण्यासाठी कोणती संघटना उपयुक्त ठरेल असा प्रश्न उभा राहतो. माझ्या मतानें पुढील रूपरेषेप्रमाणें गांव–सहकारी बँकांची संघटना करणें हा योग्य उपाय होईल. माझी योजना अशीः— प्रत्येक तालुक्यांत १० ते १५ ठिकाणें अशीं असतात कीं, त्यांना निमशहरें असें म्हणतां येईल. खेडेगांवच्या लोकांना आठवड्यांतून एकदां तरी अशा ठिकाणीं बाजारहाट करण्यासाठी यावें लागतें. अशा ठिकाणीं मर्यादित जबाबदारीच्या तत्त्वावर गांव–सहकारी–बँकेची स्थापना करण्यांत यावी. ह्या बँकेचें कमींत कमी वसूल भांडवल ५,००० रुपये असावें आणि तें ठरवितांना गांवाचें महत्त्व, खेडेगांवांची संख्या आणि लोकसंख्या ह्यांचा विचार करण्यांत यावा. बँकेचें सभासदत्व खेडेगांवाच्या गटांतील सर्व सहकारी संस्थांना आणि व्यक्तींना खुलें असावें. पहिलीं पांच वर्षें कारभार पाहाण्यासाठीं एक मॅनेजमेंट कमिटी रजिस्ट्रारनें नेमावी. ह्या कमिटींत त्या भागांतील प्रतिष्ठित आणि पक्षातीत असे गृहस्थ नेमण्यांत यावेत.

बँकेनें ठेवी व बचतींचे पैसे स्वीकारावे; पण त्याची मुदत ५ वर्षांपेक्षां अधिक असूं नये. प्रारंभीं चेकसनें व्यवहार करतां येण्यासारखीं चालू खातीं उघडण्यांत येऊं नयेत. परंतु सेव्हिंग्ज बँक डिपॉझिट्स घेण्यांत यावींत आणि त्यांतून पैसे काढण्याची मुभा असावी. हे पैसे कोणत्याहि दिवशीं कामकाजाच्या ठरलेल्या वेळांत काढतां यावे. बँकेला एक बरीशी कचेरी असावी आणि तीमधील काम पगारी सेक्रेटरीकडून करून घ्यावें. जिल्ह्याच्या मध्यवर्ती बँकेच्या हुकमतीखालीं त्यानें काम करावें. जिल्हा कोऑपरेटिव्ह बँकेची तालुका-शाखा अगर प्रॉ. को-ऑप. बँक ह्यांच्या नियंत्रणाखालीं गांव-सहकारी बँका देण्यांत याव्या.

ह्या बँकांनीं पहिलीं पांच वर्षें फक्त ठेवी घेण्याचेंच काम करावें. जी रक्कम जमा होईल त्यापैकीं ५० टक्के रक्कम ३॥ टक्के व्याजाच्या दराच्या नॅशनल ट्रेझरी डिपॉझिट्समध्यें गुंतविण्यांत यावी आणि ५० टक्के जिल्ह्याच्या मध्यवर्ती संस्थेकडे ठेवण्यांत यावी. गांवं-सहकारी बँकांनीं सेव्हिंग्ज डिपॉझिटस् २ टक्के दरानें आणि फिक्सड् डिपॉझिटस् ३ टक्के दरानीं घ्यावींत. व्याजाचा दर अर्थातच मुदतीवर अवलंबून राहील. ह्या गांव-सहकारी बँकांसाठी जीं नॅशनल ट्रेझरी डिपॉझिटस् देण्यांत येतील तीं व्याजासह केव्हांही वटविण्याची आणि मध्यवर्ती संस्थेकडे गहाण टाकण्याची सोय ठेवावी. म्हणजे बचत करण्यास थोडें उत्तेजनहि मिळेल आणि बजत करणाऱ्यांची सोयही होईल. जिल्हा मध्यवर्ती संस्थेनें तिच्याकडे ज्या रकमा ठेवण्यांत येतील त्यावर अर्धा टक्का अधिक म्हणजे २॥ टक्के व्याज देण्यास हरकत नाहीं. गांव–सहकारी बँकांतील ठेवीदारांचे पैसे द्यावयाचे असतील त्यावेळीं मध्यवर्ती संस्थेकडील रकमा परत करण्याची सोय असावी. वाटेल तेव्हां पैसे काढण्याची सोय व नॅशनल ट्रेझरी डिपॉझिटस्च्या तारणावर ओव्हर ड्राफ्ट आणि कर्जाची सवलत ठेवल्यास गांव–सहकारी बँका आपल्याजवळ रोख पैसा ठेवणार नाहींत.

योग्य तो अनुभव येईपर्यंत निदान १० वर्षें तरी ह्या बँकांनीं कर्जें देण्याचे व्यवहार करूं नयेत. एखाद्या सभासदाला पतीवर कर्जें देतांना गांव–सहकारी बँकेंत त्यानें घातलेलें भांडवल आणि ठवलेली ठेव ह्यांचा विचार करण्यांत यावा. ही योजना प्रथम ५ वर्षें अंमलांत आणावी आणि ह्या अंमलबजावणींत कांहीं तूट आल्यास ती राज्य सरकारनें अगर मध्यवर्ती सरकारनें मदत देऊन भरून काढावी. (को. कार्टर्ली)

---

### भारतीय वहातूक व्यवस्थेचा आढावा

सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रॅन्सपोर्टच्या स्टॅंडिंग कमिटीची एक बैठक नवी दिल्ली येथें भरली होती. ह्या बैठकींत देशाच्या वहातूक व्यवस्थेच्या कामाचा आढावा घेण्यांत आला. कमिटीला असें आढळून आलें कीं बंगाल आणि बिहारमधील कोळशाच्या खाणींमधून जितक्या कोळशाच्या वाघिणी पाठविल्या जावयास पाहिजे होत्या तितक्या त्या गेल्या नाहींत. जानेवारीच्या निम्म्यापर्यंत २,९३५ वाघिणी पाठविण्याचें उद्दिष्ट ठरलें होतें. परंतु ही परिस्थिति नेहमींची नाहीं. ज्या भागांत धान्याचा तुटवडा आहे, त्या भागांत धान्याची वहातूक कशी काय चालली आहे त्याचाहि विचार करण्यांत आला. नोव्हेंबरमध्यें एकूण ३,७८,००० टन अन्नधान्याची वहातूक करण्यांत आली होती. डिसेंबरमध्यें त्यापेक्षा जरा अधिक म्हणजे ३,९३,३०० टन अन्नधान्य वाहून नेण्यांत आलें. ही वहातूक भारतीय बंदरांमधून अगर धान्य सांठविण्याच्या इतर केंद्रांपासून करण्यांत आली. नोव्हेंबरमध्यें भारतीय बंदरांत ६२ बोटी आल्या आणि त्यामधील ३,३६,२०० टन माल उतरविण्यांत आला. डिसेंबरमध्यें भारतीय बंदरांत ७१ जहाजें आलीं व त्यांमधून ४,०२,९८२ टन माल उतरून घेण्यांत आला. डिसेंबरमधील दुसऱ्या पंधरवड्यांत मुंबई बंदरांत बोटी फार आल्या. त्यांत अन्नधान्याच्याच अधिक होत्या. सर्व बंदरांतून रेल्वेनें, रस्त्यानें व जलमार्गानें माल हलविण्याचे समाधानकारक काम करण्यांत आलें. नोव्हेंबर महिन्यांत अन्नधान्य व इतर माल वाहून नेण्यासाठीं ८५० खास गाड्या सोडण्यांत आल्या. डिसेंबर महिन्यांत ह्याच कामासाठी ८४९ खास गाड्या सोडण्यांत आल्या.

---

**औषध–विषयक चित्रपटाला बंदी**—औषध घेण्याचे दुष्परिणाम दाखविणारा ‘दि डेव्हिल्स वीड’ नांवाचा एक अमेरिकन चित्रपट ब्रिटनमध्यें दाखविला जात आहे. परंतु वोल्व्हर हॅम्प्टन ह्या गांवाच्या स्थानिक–कमिटीनें तो दाखविण्यास बंदी केली आहे. ब्रिटिश सेन्सॉर बोर्डानें चित्रपट दाखवावा किंवा नाहीं तें स्थानिक अधिकाऱ्यांवर सोपविलें होतें.

## पंचवार्षिक योजनेंतील शेतीचा विकास

### राज्य सरकारांना सूचना

नियोजन मंडळानें राज्य सरकारांना कांहीं दिवसांपूर्वी पाठविलेल्या एका पत्रकांत पंचवार्षिक योजनेच्या मसुद्यांतील शेतकी विकासाबाबत केलेल्या तीन सूचनांकडे विशेष लक्ष वेधलें आहे. या योजनेंतील अन्न व शेतकीविषयक कार्यक्रमांची अंमलबजावणी इतकी महत्त्वाची आहे कीं, वाटेल ती किंमत देऊन त्यांचें यश निश्चित झालेंच पाहिजे असें या मंडळाचें मत आहे. मसुद्यांतील शेतकीविषयक लक्ष्यांची पुनः एकदां माहिती मागवून मंडळानें म्हटलें आहे कीं, अखेरच्या अहवालांत देशापुढें ठेवण्यांत येणाऱ्या शेतकींतील जादा उत्पादनाच्या लक्ष्यांचा अचूकपणें व वास्तवतेनें अंदाज केला असणें जरूर आहे.

### कार्यक्रमाची आखणी करा

यांतील पहिली सूचना अशी आहे कीं प्रत्येक राज्यानें पंचवार्षिक योजनेखालीं कांहीं विवक्षित विभागांचा एकानंतर दुसरा याप्रमाणें जास्तींत जास्त विकास करण्याकरितां आणि राज्यांतील बाकीच्या विभागांचा त्या मानानें कांहींशा कमी प्रमाणांत विकास करण्याकरितां कार्यक्रमाची आंखणी करावी. सुमारें १० वर्षांत प्रत्येक राज्यांतील सर्व विभागांचा अशा रीतीनें जास्तींत जास्त विकास करण्यांत यावा. आतांपर्यंत प्रत्येक राज्यांत पैशाचीं साधनें व माणसें निरनिराळ्या जिल्ह्यांत विखुरलीं गेलीं असल्याचें मंडळानें निदर्शनास आणलें आहे. यामुळें नोकरवर्ग आणि दिलेली आर्थिक मदत यांचा पाहिजे तसा ठसा उमटलेला दिसत नाहीं.

### विकासासाठी प्रदेशांची निवड

जास्तींत जास्त विकासाकरितां पाटबंधाऱ्यांच्या सोयी अगर पावसाची निश्चिति असल्यामुळें जादा प्रयत्नानें भरपूर फायदा होईल अशा विभागांची प्रथम निवड करण्यांत यावी. कारभार, भांडवल व मालाचा पुरवठा यांचें एकीकरण न्याय्य ठरेल इतक्या प्रमाणांत तो प्रदेश मोठा व सुटसुटीत असावा, तसेंच या विकास प्रदेशांत संकल्पित कार्यक्रम अमलांत आणल्यास, पूर्वीपेक्षां धान्य आयात कमी किंवा निर्यात जास्त केली जाईल असें त्या राज्यांनीं आश्वासन दिलें पाहिजे असें मंडळानें सुचविलें आहे. या दृष्टीनें राज्यसरकारांनीं विकास करावयाच्या प्रदेशांची सध्यांची यादी तपासून पाहावी अशी त्यांना विनंति करण्यांत आली आहे.

### "जनता चळवळ" बनण्यासाठी योग्य संस्थांची निवड

सबंध-गांवाचा विचार करून प्रत्येक गांवासाठीं तयार केलेला व्यापक कार्यक्रम आधारभूत धरून व खेड्यांतील सहकारी संस्थाद्वारां शेतकीसाठी द्यावयाची मदत द्यावी, अशी दुसरी सूचना आहे. मागील काळांत कामाचा विशिष्ट कार्यक्रम व यंत्रणा लक्षांत न घेतां व्यक्तीगत शेतकऱ्यास साह्य करण्यांत येई असें मंडळानें म्हटलें आहे. पुढील काळांत सहकारी संस्था, ग्रामउत्पादन मंडळें, शेतकरी संस्था, यांसारख्या योग्य संस्थांचा या कामीं शक्य तितक्या अधिक प्रमाणांत उपयोग करून घेऊन त्यांचें मार्फत व्यक्तिगत शेतकऱ्यांना साह्य करावें. ज्या ठिकाणीं अशा संस्था अस्तित्वांत नाहींत तेथें त्या स्थापन करून या कामासाठी प्रत्येक जिल्ह्यानें कार्यक्रमाची आंखणी करावी. सध्या सरकारी साह्याच्या कारभाराची सर्व जबाबदारी त्यां खात्यावरच पडते व शेतकऱ्यांना आपल्या धान्योत्पादनाच्या कार्यक्रमाची आंखणी करण्यास पुरेसा वाव मिळत नाहीं. राज्यसरकारांकडून सर्व प्रकारचें साह्य मिळालें तरी 'अधिक धान्य पिकवा' मोहिमेच्या यशाची प्रमुख अट म्हणजे ती "जनता चळवळ" बनली पाहिजे व तिनें स्वतःहून गतीशील व स्वयंप्रेरक झालें पाहिजे, यावर मंडळानें विशेष भर दिला आहे.

सरकारतर्फें मिळणारी आर्थिक मदत व मालाचा पुरवठा सहकारी चळवळींच्या द्वारां वाढत्या प्रमाणांत मिळेल अशा रीतीनें त्याची व्यवस्था केली जावी अशी तिसरी सूचना मंडळानें केली आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सारस्वत कॉलनी, सोमवार पेठ, पुणें.
बचतीच्या विविध योजना
हेड ऑफिस—गिरगांव, मुंबई.

---

### साखरेच्या विक्रींतील बिनामी व्यवहार

"चालू मोसमांतील उसाची लागवड ४१·३८ लक्ष एकर, म्हणजे गेल्या मोसमापेक्षा १४·२% ज्यास्त आहे. त्यामुळें साखरेचें उत्पादन १२ लक्ष टन होईल. त्यांत १·६९ लक्ष टन मिळविले, म्हणजे १३·६९ लक्ष टन साखर उपलब्ध होऊं शकेल. परंतु, भारताची वार्षिक गरज १२·५ लक्ष टनांची असल्यानें पुढील वर्षासाठी सुरवातीचा साठा पुरेसा उरूं शकेल. १९४९ मध्यें ९·८ लक्ष टन साखरेचें उत्पादन झालें होतें व १९५० मध्यें तें ११ लक्ष टन झालें होतें. नियंत्रण थोडें ढिलें केलें, त्यामुळें उत्पादन वाढत गेलें असलें तरी त्याला इतरहि कारणें आहेत. गुळाची किंमत कमी झाल्यानें उसाचा गूळ करण्याकडे विनियोग कमी झाला. उसाची लागवड वाढल्यानें पुरवठाहि वाढला आणि साखरेचा उताराहि सुधारला.

"साखरेच्या बाजारांत बिनामी सौदे चालू आहेत त्यामुळें सरकारचें प्राप्ती कर उत्पन्न बुडत आहे. उदाहरणार्थ, 'अ' साखर कारखाना १०० रुपयांस साखर विकतो, परंतु बिलांत फक्त ६० रु दाखवितो. बाकीचे ४० रु. मिलच्या मॅ. एजंटांच्या व सेलिंग एजंटांच्या खिशांत जातात. अशा रीतीनें गेल्या वर्षांत ५ कोटी रुपयांचें उत्पन्न झालें असलें पाहिजे. त्यावरील इनकमटॅक्स बुडाला आहे" :—बॉंबे शुगर मर्चंटस असोसिएशनचा १९५१ चा अहवाल.

---

### परराष्ट्रीय व्यापारांत तूट : आठ महिन्यांचा आढावा

भारताच्या १९५१–५२ च्या पहिल्या आठ महिन्यांतील परराष्ट्रीय व्यापारांत १२१·२५ कोटी रुपयांची तूट आली. एप्रिल १९५१ ते नोव्हेंबर १९५१ ह्या मुदतींत भारतानें जल व आकाश मार्गें ४७८·८८ कोटी रुपयांचा व खुष्कीच्या मार्गें १४·५९ कोटी रुपयांचा माल निर्गत केला. आयात मालाची पुनः निर्गत झाली तिची किंमत ११·०८ कोटी रु. होती. म्हणजे, एकूण निर्गत ५०४·५५ कोटी रुपयांची झाली. जल व आकाश मार्गें ६१८·४१ कोटी रुपयांची मालाची व खुष्कीच्या मार्गें ८४·७७ कोटी रुपयांच्या मालाची आयात झाली. ह्या सर्वांमुळें ११३·६३ कोटी रुपयांची एकूण तूट आली असती, परंतु कांहीं हिशेबी येणीं–देणीं विचारांत घेता त्यांत आणखी ७·५५ कोटी रु. तुटीची भर पडली.

## १९५१ मधील शेडयूल्ड बँकांचे ताळेबंद

**ठेवींत घट, कर्जांत वाढ, कर्जांचें ठेवींशीं प्रमाण ६२·४% झालें**

१९५१ सालीं शेडयूल्ड बँकांकडील एकूण ठेवी १६·५७ कोटी रुपयांनीं घटून ८४६·२१ कोटी रुपयांवर आल्या. २६·०७ कोटी रुपयांच्या चालू ठेवी कमी झाल्या, परंतु मुदती ठेवींत ९·५० कोटी रुपयांची वाढ झाल्याकारणानें एकूण ठेवींतील घट १६·५७ कोटी रुपयेच भरली. बँकांनी एकमेकांकडून घेतलेलीं कर्जें १९५० चे अखेर १९·४४ कोटी रुपयांचीं होतीं, तीं १९५१ चे अखेर २३·०७ कोटी रुपये झालीं. म्हणजे, त्यांत ३·६३ कोटी रुपयांची वाढ आहे. पैशाला असलेल्या मोठ्या मागणीचें हें प्रतिबिंब आहे. ह्या कर्जांची आणखी छाननी केली, तर मागणी येतांच परत केलीं पाहिजेत अशीं कर्जें १८·१३ कोटी रुपयांवरून २२·३२ कोटी रुपयांवर गेलीं आणि मुदतीचीं कर्जें १·३१ कोटी रुपयांवरून ७५ लक्ष रुपयांवर खालीं आलीं.

शेडयूल्ड बँकांनीं दिलेल्या कर्जांत व हुंड्यांच्या खरेदींत व डिस्कौंटमध्यें १९५१ मध्यें पुष्कळच वाढ झाली. १९५० अखेर ह्या सर्वांची रक्कम ४४५·१५ कोटी रुपये होती, ती १९५१ अखेर ५४२·५३ कोटी रुपये झाली. कर्जांचें एकूण ठेवींशीं प्रमाण वर्षापूर्वीं ५०·४६% होतें तें ६२·४१% वर चढलें. खालील तपशीलवार आकडे हें सर्व स्पष्ट करून दाखवितील:—

(आकडे कोटी रुपयांचे)

| | २८ डिसें. १९५१ | २९ डिसें. १९५० | फरक |
|---|---|---|---|
| डिमांड देणीं | ५५३·७४ | ५७९·८१ | — २६·०७ |
| टाइम देणीं | २९२·४७ | २८२·९७ | + ९·५० |
| एकूण देणीं | ८४६·२१ | ८६२·७८ | — १६·५७ |
| बँकांचीं एकमेकांकडील कर्जें | | | |
| डिमांड देणीं | २२·३२ | १८·१३ | + ४·१९ |
| टाइम देणीं | ००·७५ | १·३१ | — ०·५६ |
| | २३·०७ | १९·४४ | + ३·६३ |
| कर्जें | ५०५·७१ | ४३२·२७ | + ७३·४४ |
| बिल्स | ३६·८२ | १२·८८ | + २३·९४ |
| रोख शिलका | ८८·५१ | ९४·५९ | — ६·०८ |

### पुणें पीपल्स को. बँक लि.

वरील बँकेच्या प्रत्यक्ष कामास सुरुवात गुरुवार दि. ३१ जानेवारी रोजीं वसंत पंचमीचे सुमुहूर्तावर झाली. त्यानिमित्त सायंकाळीं ५ ते ७ पानसुपारी समारंभ करण्यांत आला. बँकेची कचेरी २७० सदाशिव, पेरू गेटाशेजारीं, इंदिरा छापखान्याचे इमारतींत आहे. श्री. दा. वा. पोतदार हे बँकेचे चेअरमन असून श्री. द. दि. चितळे हे मॅ. डायरेक्टर आहेत.

### दि कॅनरा बँक लि.

वरील बँकेस १९५१ मध्यें ७,३८,५४७ रु. नफा झाला. ९% डिव्हिडंड कायम रहाणार आहे. १९५० चे मानानें १९५१ सालचा नफा ४०,२७७ रु. नीं ज्यास्त आहे. ३१ डिसेंबरच्या बाजारभावापेक्षां कमी दरानें रोख्यांची किंमत दाखविण्यांत आली आहे.


**ठेवी स्वीकारण्यांत येतात**

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वीं आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन २२७३८ तारेचा पत्ता: 'PEDNECO' Bombay



**भोर स्टेट बँक लि.**

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ७१,६०० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. न. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. श्री. चं. रा. राठी.
श्री. के. वि. केळकर, एम्. ए., एलएल्. बी. श्री. बा. ग. धंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

बँक १ ते ४ वर्षें मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.


दराबाबत समक्ष चौकशी करावी.

पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबानजीक. फोन नं. २५७६.

अधिक माहितीसाठीं लिहा.

रा. गो. आगाशे, बी. ए. (ऑ.)
मॅनेजर.





## महाबळेश्वर विभागांतील मधोत्पादन धंद्याची प्रगति

मधमाशापालनाचा धंदा पद्धतीनें कसा करावा याची माहिती शेतकरी व इतर खेडूत लोकांना देऊन जनतेला चांगला व भरपूर मध, ग्रामीण जनतेस शेतीस पूरक व शेतीचें पीक वाढविण्यास उपकारक असा जोड धंदा उपलब्ध करून देण्यासाठीं मुंबईराज्य ग्रामोद्योग समितीच्या महाराष्ट्र विभागातर्फे महाबळेश्वर येथें १९४७ सालीं कामास सुरुवात झाली. आज चार वर्षांत या उपक्रमाचा फायदा महाबळेश्वर विभागांतील ग्रामीण जनतेस बराच मिळूं लागला आहे.

कार्यास सुरुवात झाली तेव्हां समितीच्या मार्गदर्शनाखाली फक्त एक मधपाळ काम करण्यास तयार झाला आणि त्याचे जवळ फक्त १० वसाहती होत्या, त्यांतून २० पौंड मध मिळाला. पण आज महाबळेश्वर विभागांत समितीच्या एकूण पांच उपकेन्द्रांमार्फत ५१ खेड्यांत हा धंदा पसरला असून ३६५ मधपाळ याचा फायदा घेत आहेत. या मधपाळांच्या जवळ एकूण वसाहती १०१५ आहेत. १९५१ च्या हंगामांत या वसाहतींनीं १२,६९५ पौंड मध दिला. या प्रगतीबरोबरच मधमाशांच्या वसाहती जास्तीत जास्त मधदायी कशा कराव्यात याबाबतचे प्रयोगहि बरेच यशस्वी झाले आहेत. पहिल्या वर्षाच्या १० वसाहतींपैकीं फक्त पांच वसाहतींनीं मध दिला तर गेल्या हंगामांतील १०१५ वसाहतींपैकीं ७८६ वसाहतींनीं मध दिला. म्हणजे, मध देणाऱ्या वसाहतींनीं प्रत्येकीं दिलेल्या सरासरी मधाचें प्रमाण चार पौंडांवरून सोळा पौंडांवर आलें आहे. याच काळांत एका वसाहतीनें दिलेल्या जास्तींत जास्त मधाचें प्रमाणहि आठ पौंडांवरून १०० पौंडांवर गेलें. या मधोत्पादनाच्या धंद्यानें त्या भागांतील जनतेस गेल्या हंगामांत मधविक्रीचे १९ हजार रुपये मिळवून दिले. एका पंगु माणसानें तर ७१४ रुपये मिळविले. या भागांतील शेती व इतर धंद्यांपासून मिळणारें वार्षिक उत्पन्न लक्षांत घेतां या उत्पन्नाचें महत्त्व विशेषच म्हणावें लागेल. गेल्या हंगामांत लोकांना एका वसाहतीमागे सरासरी चोवीस रुपये चार आणे मिळाले.

समिति मधपाळांस रास्त किंमतीस मधपेट्या पतीवर देते व मधपेट्यांची किंमत मधाचे किंमतींतून सोयीस्कर हप्त्यांनीं वसूल करण्यांत येते. समितीचा शिक्षित नोकरवर्ग मधपाळांच्या अडीअडचणींचे निवारण करतो. त्यांनीं दाखविलेल्या वसाहती पकडून देतो. त्यांची निगा राखण्यांत मदत करतो आणि त्यांच्या वसाहतींतील मध शास्त्रीय पद्धतीनें हाच शिक्षित नोकरवर्गच काढतो. समिति हा मध स्वच्छ करून विकते. मधविक्रींतून झालेला नफा म्हणून मधपाळांस या काळांत एकूण चार हजार रुपये समितीनें वाटले.

आतां या मधपाळांची एक सहकारी संघटना उभारून तिच्या मार्फत हा धंदा संघटित करण्याचे प्रयत्न करण्याची वेळ आली आहे. महाबळेश्वर विभागांतील मधोत्पादन मधपाळांच्या सहकारी संघटनेनें जबाबदारी उचलली कीं, मग समिति मधमाशा वसाहतींची मधोत्पादनक्षमता वाढविणें, हव्या त्या जातीच्या वसाहती भरपूर प्रमाणांत वाढविण्यासाठी नर्सरी काढणें, मधमाशांनीं पिकांत किती वाढ होते, याबाबत व इतर तत्संबंधीं संशोधन करून महाबळेश्वरप्रमाणें इतरत्र जेथें जेथें मध धंदा वाढविणें शक्य असेल तेथें प्रयत्न करणें, हीं कामें अधिक नेटानें हातीं घेईल.

### राजपिपळा महाराजांचे वारस

इंग्लंडमध्यें स्वतःचे रेसचे घोडे ठेवणारे राजपिपळाचे महाराज गेल्या एप्रिलमध्यें मरण पावले. त्यांनीं इंग्लंडमधील त्यांची सुमारें ३० लक्ष रुपयांची मालमत्ता त्यांच्या इंग्रज पत्नीच्या नांवें ठेवली आहे. तिच्या नांवानें भारतांत असलेले रोखे, अमेरिकेंतील, स्वित्झरलंडमधील व फ्रान्समधील घोडे, पैसे व रोखे, हे सर्व तिला मिळणार आहेत. राजपिपळा संस्थानाच्या कायद्याप्रमाणें महाराजांच्या कोणत्याहि इतर पत्नीच्या कोणत्याहि मुलास जेवढा वारसा मिळेल, तेवढाच वारसा मिसेस एलापासून त्यांना झालेल्या मुलांना मिळावा, असेंहि त्यांनीं लिहून ठेवलें आहे.

### मोफत औषधोपचार बंद होणार

ग्रेट ब्रिटनमध्यें नागरिकांना मोफत वैद्यकीय मदत उपलब्ध करून देणाऱ्या कायद्याची योजना मजूर सरकारनें केली होती. त्या योजनेंतील गोष्टींसाठीं आतां आकारणी करण्यास प्रारंभ करणारें एक बिल चर्चिल मंत्रिमंडळानें पार्लमेंटांत मांडलें आहे. सध्या डॉक्टरी तपासणी, औषध योजना, दंतवैद्याचें काम, हीं सर्व मोफत आहेत. लंडन ट्रेड्स कौन्सिलच्या कार्यकारी मंडळानें जाहीर सभा, मोर्चे व शिष्टमंडळें ह्यांचा उपयोग करून बिलाचा निषेध करण्याचें ठरविलें आहे.

### मधमाशापाळांचें दुसरें संमेलन

मुंबई राज्य ग्रामोद्योग समितीच्या महाबळेश्वर केंद्रखालील मधुमक्षिकापालकांचें दुसरें संमेलन महाबळेश्वर येथें शनिवार ता. ९ फेब्रुवारी १९५२ रोजीं भरविण्याचें ठरलें आहे. श्री. आर. एन्. त्रिवेदी, जॉइंट रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्हज् अँड व्हिलेज इंडस्ट्रीज्, पुणें यांनीं संमेलनाचें अध्यक्षपद स्वीकारण्याचें मान्य केलें आहे. उद्योगमंत्री श्री. नाईक निंबाळकर उद्घाटन करतील.

### ग्रामपंचायत, बावची ( द. सातारा )

बावची ग्रामपंचायतीचा सन १९५०-५१ चा अहवाल पाहतां, या संस्थेनें स्थापनेपासून काटकसरीचें धोरण ठेवून, साल अखेर तीन हजार रुपये शिल्लक टाकले आहेत. गांवच्या सोयींमध्यें गतवर्षापासून दिव्यांची भर पडली असून, चालू वर्षी दवाखान्याची कायम व्यवस्था करण्याचें मंडळीनें ठरविलें आहे. अधिकारी वर्गानीं वेळोवेळीं भेटी देऊन संस्थेस 'अ' वर्ग दिला आहे, हें चालकांस भूषणावह आहे. श्री. पांडुरंग नाना यादव हे सरपंच असून श्री. कुतुबुद्दिन मुलाणी हे सेक्रेटरी आहेत.

### हिंदुस्तान शिपयार्ड लि.

शिंदा कंपनीचा विजगापट्टम येथील आगबोटींचा कारखाना घेऊन चालविणारी हिंदुस्थान शिपयार्ड ही कंपनी जॉइंट स्टॉक कंपनी म्हणून २१ जानेवारी रोजीं दिल्ली येथें नोंदण्यांत आली. भारत सरकारचें तिच्यांत दोन तृतीयांश व शिंदा कंपनीचें एक तृतीयांश भांडवल राहील.

### अमेरिकेची पाकिस्तानला मदत

३० जून, १९५२ अखेर पाकिस्तानला एक कोटी डॉलरची मदत देण्याचा करार अमेरिका-पाकिस्तानमध्यें झाला आहे.

### ब्रिटिश पुस्तकांच्या विक्रीचा उच्चांक

आजपर्यंत कधींहि विकलीं नव्हतीं इतकीं पुस्तकें ब्रिटिश प्रकाशकांनीं गेल्या वर्षा विकलीं. पुस्तकें प्रसिद्ध करण्याच्या कामींहि त्यांनीं असाच उच्चांक गांठला आहे. 'बुकसेलर' ह्या मासिकानें अशी माहिती दिली आहे कीं गतवर्षी १८,०६६ पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं. ह्यापूर्वी १९३७ सालीं सर्वांत अधिक पुस्तकें प्रसिद्ध करण्यांत आलीं होतीं. त्या सालापेक्षा वरील आंकडा १,०२९ पुस्तकांनीं अधिक आहे. एकूण पुस्तकांपैकीं ५,००० पुस्तकें जुनींच पण नव्यानें छापण्यांत आलीं अगर त्यांच्या नव्या आवृत्त्या काढण्यांत आल्या. त्यांत करमणूकप्रधान कथा-कादंबऱ्यांची संख्या सर्वांत अधिक होती. १९५१ सालांत दररोज १० ते ११ कथा-कादंबऱ्या प्रकाशित होत असत. शिक्षण-विषयक पुस्तकांच्या संख्येंतहि वाढ झाली. ही संख्या १,३७० वरून १,५५९ इतकी झाली. ब्रिटनच्या बाहेरील वाचकांनीं ५५,००,००० पौंड किंमतीचीं पुस्तकें विकत घेतलीं. १९५० सालीं जितक्या किंमतीचीं परदेशी पुस्तकें परकीयांनीं विकत घेतलीं त्यापेक्षा वरील किंमतीचा आकडा ५,००,००० पौंडांनीं अधिक आहे. आस्ट्रेलिआनें १८,००,००० पौंड किंमतीचीं म्हणजे सर्वांत अधिक पुस्तकें विकत घेतलीं. त्याच्या खालोखाल अमेरिकेनें १४,००,००० पौंडांचीं पुस्तकें विकत घेतलीं. इंग्लिश भाषा जाणणाऱ्या जगाच्या बाहेरील देशांपैकीं, जर्मनीनें सर्वांत अधिक म्हणजे २,५०,००० पौंड किंमतीचीं पुस्तकें विकत घेतलीं. कथा-कादंबऱ्यांसारख्या करमणुकीच्या साहित्याची अजूनहि कशी चलती आहे तें ह्या माहितीवरून दिसून येतें. वास्तवतेपेक्षा स्वप्नसृष्टि नेहमींच रम्य वाटते, असा त्यावरून अर्थ निघत नाहीं काय?

---

### दुग्धालय संशोधन संस्थेनें तयार केलेलें जलहरक यंत्र

बंगलूर येथील भारतीय दुग्धालय संशोधन संस्थेनें मलई काढून घेतलेल्या दुधाचें भुकटींत रूपांतर करण्यासाठीं एक साधें जलहारक यंत्र (ड्री-हायड्रेटिंग प्लँट) तयार केलें असून घरगुती उद्योगधंद्याचा पाया म्हणून त्याचा उपयोग करतां येईल. दुधाच्या धंद्यांतील ताक, मलई काढून घेतलेलें दूध, यांसारख्या उपपदार्थांचा उपयोग करून घेण्याबाबत या संस्थेनें चालविलेल्या संशोधनाची ही फलनिष्पत्ति असून अशा रीतीनें झालेली भुकटी अत्यंत पोषक असल्याचें आढळून आलें आहे.

ताक घुसळून लोणी काढल्यानंतर राहिलेलें ताक फारच थोडा वेळ चांगल्या स्थितींत राहूं शकतें. तथापि त्याचें भुकटींत रूपांतर करतां येऊन त्याचे अंगीं ताकाचे सर्व गुण बराच काल टिकतात. चुन्याचे साहाय्यानें ताकाची आम्लता कांहीं प्रमाणांत कमी करून विरतवाखालीं उघड्या काहीलींत हळूहळू तापवून पळीनें ढवळून ही गोष्ट साध्य करतां येते. विशिष्ट अवस्थेंत ताकाचा अर्धवट घट्ट पदार्थ तयार झाल्यावर तो काहीलींतून काढून घेण्यांत येऊन त्याचे बारीक कण तयार करण्यांत येतात व ते एका ट्रेमध्यें घालून गरम हवेच्या वाफाऱ्यानें पूर्णपणें सुकविले जातात. अशा रीतीनें ते पूर्ण वाळल्यावर पॅकिंग करण्यापूर्वी त्यांची पूड करण्यांत येते.

---

**इराण-रशिआ व्यापार पुन्हा सुरू झाला**—रशिआ आणि इराण ह्यांनीं मध्यंतरीं बंद पडलेलीं व्यापारी बोलणीं पुन्हा चालू केलीं आहेत. परस्पर झालेल्या कराराप्रमाणें व्यापारी देवघेवीची फेरतपासणी दरवर्षी करण्यांत येते. गेल्या वर्षी परस्परांत जितकी देवाणघेवाण व्हावयाची होती त्यापेक्षा ती आधिक झाली.


फोनः ३७५१९ तारः SAHYOG

## दि प्रॉव्हिन्शिअल इंडस्ट्रिअल को-ऑपरेटिव्ह असोसिएशन, लि.

९ बेक हाऊस लेन, फोर्ट, मुंबई १.

उत्पादकांच्या (प्रोड्यूसर्स) सोसायट्यांना
असोसिएशन खालील मालाचा पुरवठा करतेः—

सूत, रसायनें, रंग, कच्चीं कातडीं व चामडीं,
कातडीं कमाविण्यास लागणारा माल,
कमावलेलें कातडें, इ., मशीन-
टूल्स आणि इक्विपमेंट इ.

आणि

खालील मालाच्या विक्रीस साहाय्य करतेः—

हातमागावरील कापड (सुती व लोकरी), धातूचें सामान, चंदनी लांकूड, रोजवुड आणि हस्तिदंती आर्टस् अँड क्रॅफ्टस्, रेशीम, जर, कातडीं व कातडी माल, खाद्य तेलें, लाकूड आणि कोळसा वगैरे.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठीं चौकशी करा:

ब्रँच सेक्रेटरी.

स्थापना ] पांढऱ्या कोडावर [ १९३६

श्री. अंबाजी धोंडू मोरे पो. ता. वाडे जि. ठाणें लिहितातः— मी कोडाकरितां पुष्कळ औषधें केलीं पण गुण आला नाहीं. खरोखरच आपलेच प्रभावी औषधानें माझे मुलीचें संपूर्ण कोड नाहींसें झालें. अशीं शेकडों प्रशस्तिपत्रें व बक्षिसें मिळालीं. किं. रु. ५ पो. ख. १५ आणे. वैद्य के. आर. बोरकर मु. पो. मंगरूळपीर, जि. आकोला (वऱ्हाड)

## 'अर्थ' ग्रन्थमाला.

१ बँका आणि त्यांचे व्यवहार
२ हिंदुस्थानची रिझर्व्ह बँक
३ व्यापारी उलाढाली
४ सहकार


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.